सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**धारिका क्रमांक : डीआरए-०५२१/सी.आर.१९/२०२१/जाहिरात** **जाहिरात क्रमांक : १४८/२०२१**

महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या आस्थापनेवरील **सहायक विधी सल्लागार-नि-अवर सचिव, गट-अ** संवर्गातील तीन पदांवरील भरती करीता विहित ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**२.उपलब्ध पदसंख्या :- ३**

**२.१ भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ. ज. (ब) | भ. ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | आ.दु.घ | इ.मा.व. | एकूण आरक्षित | अराखीव (खुला) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण पदे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | २ | ३ |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | २ | ३ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| अनाथ | -- | | | | | | | | | | | |
| दिव्यांग | -- | | | | | | | | | | | |

**२.२** प्रस्तुत जाहिरातींमध्ये दर्शविण्यात आलेले पदसंख्येबाबतचे आरक्षण शासनाच्या विधी व न्याय विभागाकडून प्राप्त मागणीपत्रामध्ये नमूद केल्यानुसार व शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने मान्यता दिल्यानुसार दर्शविण्यात आले आहे.

**२.३** पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**३.पात्रतेचे निकष :-**

**३.१ भारतीय नागरिकत्व**

**३.२ वयोमर्यादा :-**

**३.२.१ किमान व कमाल वयोमर्यादा:-**

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान वय | कमाल वय | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण / महिला | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक | | दिव्यांग उमेदवार |
| | | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ | |
| **१ फेब्रुवारी, २०२२** | १८ | ४० | ४५ | ४३ | ४३ | सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे | | ४५ |

**३.२.२** महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

**३.२.३** मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग आणि खेळाडू यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची सवलत यापैकी कोणतेही अधिकत्तम असलेली एकच सवलत देय राहील.

**३.२.४** अपवादात्मक शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अपवादात्मक अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोगाकडून विचार करण्यात येईल. परंतु, आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार जेव्हा मुलाखतीसाठी पुरेसे उमेदवार प्राप्त होत नसतील, तेव्हाच सदर तरतुद विचारात घेतला जाईल.

**३.२.५** अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील.

**३.२.६** अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिल करण्याकरीता विचारात घेतला जाईल.

**३.३ शैक्षणिक अर्हता –**

(a) Are holding or have held the post of Superintendent for a period of not less than five years; **OR**

(b) Are holding or haveheld the post of Under Secretary to Government on the legal side of the Law and Judiciary Department for a period of not less than one year ; **OR**

(c) Are holding or have held the post of Civil Judge (Junior Division) and Judicial Magistrate of the first class in any Judicial service for a period of not less than three years ; **OR**

(d) Have been advocates or solicitors in a High Court or Courts sub-ordinate thereto, for a period of not less than five years preferably possessing adequate experience of advising on matters relating to land tenures, administrative law, Constitutional Law, Municipal Administration and such other subjects as are relevant to the work in the Law and Judiciary Department; **OR**

(e) Possess a Degree in Law and thereafter have acquired experience of handling legal matters in an advisory capacity in a Government or Semi-Government Department for a period of not less than seven years.

**Explanation** - For the purpose of sub-clause (d) in computing the period during which a person has been an advocate or solicitor, there shall be included and period during which the person has held the post of Civil Judge (Junior Division) and Judicial Magistrate of the First Class in any Judicial service, after he become advocate or solicitor.

**३.३.१** समतुल्य / समकक्ष शैक्षणिक अर्हतेचा दावा करणा-या उमेदवाराने सदर दाव्यांच्या अनुषंगाने सक्षम प्रधिका-याकडून क्रमांक व दिनांक नमूद असलेले समकक्ष / समतुल्य अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**३.४ शैक्षणिक अर्हता व अनुभवाचा कालावधी गणना करण्याचा दिनांक :-**

**३.४.१** प्रस्तुत जाहिरातीच्या अनुसरुन अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

**३.४.२** अनुभवाच्या कालावधीची गणना प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याकरीता विहित केलेल्या अंतिम दिनांकास करण्यात येईल.

**४. संवर्ग/पद तसेच आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तपशील:-**

**४.१ सर्वसाधारण**

४.१.१. **वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगानुसार:** स्तर एस२३: रुपये ६७,७००/- ते रुपये २,०८,७००/- अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते.

४.१.२ **कर्तव्ये व जबाबदा-या**:- प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**४.१.३** सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**४.१.४** अराखीव (खुला) पदाकरीता सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारसीकरीता विचार होत असल्याने सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचुकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

**४.२ आरक्षण:-**

**४.२.१** विविध मागास प्रवर्ग, महिला, प्राविण्यप्राप्त खेळाडू, अनाथ इत्यादींसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

**४.२.२** एखादी जात/जमात राज्य शासनाक्डून आरक्षणासाठीपात्र असल्याचे घोषित केली असल्याचे संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

**४.२.३** महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच नॉन क्रिमीलेयर मध्ये मोडत असल्याबाबत (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

**४.२.४** विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गाच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**४.२.५** कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राच्या सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनीधीत्व कायदा, १९५० च्या कलम २० नुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

**४.२.६** कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणा-या उमेदवाराकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

**४.३ दिव्यांग व्यक्तींचे आरक्षण :-**

**४.३.१** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**४.३.२** शासन निर्णय, विधी व न्याय विभाग, क्रमांक इएसटी २०१९/प्र.क्र.२९२/का-२, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२१ अन्वये खालील दिव्यांग प्रवर्गातील व्यक्ती /उमेदवार सदर पदाकरीता अर्ज करण्यास पात्र आहेत:

(1) Blind, Low Vision (2) Hard Hearing, (3) One Leg, One Arm, Both Arm, Both Leg, One Arm and One leg, Both Leg and One Arm, Both Leg Arms, Leprosy Cured, Dwarfism, Acid Attack Victim, (4) Special Learning Disability (5) Multiple Disabilities involving (1) to (4) can Apply.

**४.३.३** संबंधित विषय /संवर्गासमोर नमूद दिव्यांग प्रकारचे उमेदवार पदे आरक्षित नसली तरी अर्ज करणेसाठी पात्र असतील. तथापि असे उमेदवार सर्वसाधारण पदावरील निवडीकरीता पात्र समजण्यात येईल.

**४.३.४** संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार / व्यक्ती आरक्षण तसेच निकषानुसार अनुज्ञेय सोयी सवलतीसाठी पात्र असतील.

**४.३.५** लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार / व्यक्ती खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील:-

(१) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती.

(२) दिव्यांगत्याचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयी सवलती.

**४.३.६** लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या

www.swavlambancard.gov.in या संगणकीय प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**४.३.७** लक्षणीय दिव्यांगत्व असणा-या उमेदवारांना अर्जामध्ये नमूद केलेला दिव्यांगत्वाचा प्रकार / उप प्रकार बदलणे अनुज्ञेय नाही.

**४.४ इतर अटी :-**

**४.४.१** परिविक्षाधीन कालावधी २ वर्षे राहील.

**५.निवड प्रक्रिया:-**

**५.१** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही.

**५.२** जाहिरातीस अनुसरून प्राप्त अर्जाची संख्या आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोयीस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीमध्ये नमूद शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता/अनुभव किंवा अन्य योग्य निकष यांच्या आधारे अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल.

**५.३** चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही.

**५.४** चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी (लागू असल्यास) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

**५.५** चाळणी परीक्षा घेतल्यास चाळणी परीक्षेचे गुण व मुलाखतीचे गुण एकत्रितरित्या विचारात घेऊन तर चाळणी परीक्षा न झाल्यास केवळ मुलाखतीच्या गुणांच्या आधारे उमेदवाराची शिफारस करण्यात येईल.

**५.६** मुलाखतीमध्ये किमान ४१% व त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांचाच शिफारशीसाठी विचार केला जाईल.

**५.७** प्रस्तुत पदाची निवड प्रक्रिया सहायक विधी सल्लागार-नि-अवर सचिव, गट-अ (सेवाप्रवेश नियम) १९८६ तसेच आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार राबविण्यात येईल.

**६.अर्ज करण्याची पद्धत:-**

**६.१** अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

**६.२** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mpsconline.gov.in तसेच https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**६.३** आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नोंदणी करणे व आयोगास अर्ज सादर करणे अनिवार्य आहे.

**६.४** अर्ज सादर करण्याकरीता आयोगाच्या संकेतस्थळ :- https://mpsconline.gov.in

**६.५** अर्ज सादर करण्याचे टप्पे:-

**६.५.१** आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीवर यापुर्वी विहित पध्दतीने नोंदणी केली नसल्यास नोंदणी करुन खाते (Profile) तयार करणे.

**६.५.२** खाते तयार केलेले असल्यास व ते अदययावत करण्याची आवश्यकता असल्यास अद्ययावत करणे.

**६.५.३** विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने आवश्यक कागदपत्रे अपलोड करून अर्ज सादर करणे.

**६.५.४** परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

**६.६ विहित प्रमाणपत्र/कागदपत्रे अपलोड करणे :-**

**६.६.१ प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने उमेदवाराची पात्रता अजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसा पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) अपलोड करावी लागतील :-**

| अ. क्र. | प्रमाणपत्र/कागदपत्र | फाईल फॉर्मेट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (KB) |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता | PDF | ५० | ५०० |
| २ | वयाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ४ | सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ५ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ६ | नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| ७ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ८ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ९ | खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १० | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ११ | अराखीव महिला, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| १२ | एस.एस.सी. मधील नावात बदल झाल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १३ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १४ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | PDF | ५० | ५०० |
| १५ | अनुभवाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १६ | राज्य शासकीय कर्मचारी यांच्याकरीता वयोमर्यादेतील सवलतीचा दावा असल्यास सादर करावयाचे प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | बार कौन्सिल ऑफ इंडिया / महाराष्ट्र आणि गोवा अन्वये नोंद केलेल्या प्रमाणपत्राची प्रत | PDF | ५० | ५०० |

**६.६.२** उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' प्रकरण क्रमांक चार मध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

**६.६.३** संबंधित जाहिरातीस अनुसरुन विहित निकष/पात्रता तसेच प्रोफाईलमधील दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड करावी लागतील. प्रोफाईलमधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अपलोड करावयाची संबधित कागदपत्रे प्रणालीद्वारे अर्ज सादर करताना प्रदर्शित होतील.

**६.६.४** पात्रतेसंदर्भातील विविध दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.

**६.७** अर्ज सादर करण्याचा कालावधी:- **दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ ते दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**६.८** आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**६.९ शुल्क रुपये:**

**६.९.१** अराखीव (खुला)- **७१९/- रुपये**

**६.९.२** मागासवर्गीय, आर्थिक दुर्बल घटक व अनाथ - **४४९/-** रुपये

**६.९.३** उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक शुल्क तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

**६.९.४** परीक्षा शुल्क ना परतावा (Non-refundable) आहे.

**६.१०** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा:-

**६.१०.१** शुल्क भरण्याकरिता मुख पृष्ठावरील 'माझे खाते' या लिंक वर क्लिक करावे.

**६.१०.२** 'माझे खाते' या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. 'Unpaid' लिहिलेल्या जाहिरात / पद / परीक्षेसमोर ' Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

**६.१०.३** 'Pay Now' या लिंक वर क्लिक केल्यानंतर दोन पर्याय उपलब्ध होतील:- **(१)** ऑनलाईन पेमेंट **(२)** चलनाद्वारे

**६.१०.४** क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, युपीआय अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

**६.१०.५**चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

**६.१०.६**भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**६.१०.७** **ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**६.१०.८** **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ - बँकेच्या कार्यालयीन वेळेत.**

**६.१०.९**ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) लगेचच अवगत होईल. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरले असल्याबाबत Logout करण्यापूर्वीच खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत परीक्षेच्या अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे.

**७.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरती प्रकियेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती अधिकृत समजण्यात येईल.

**८.** सविस्तर जाहिरात आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**ठिकाण : मुंबई.**
**दिनांक : २८ ऑक्टोबर, २०२१**

**सह सचिव, (जाहिरात)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.